पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : ४२ • जुलै व ऑगस्ट २०१४ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## पुणे महानगरपालिका सुधारित आकृतीबंधास शासनाची मंजुरी

पुणे महानगरपालिकेची वाढती लोकसंख्या, नागरीकरणाचा झपाट्याने होणारा विकास, शासनाच्या विविध योजना व त्या अनुषंगाने वाढलेले कामकाज विचारात घेता, पुणे मनपाने विविध संवर्गातील पदांमध्ये वाढ करणे, नवीन पदे/संवर्ग निर्माण करणे आवश्यक होते.

या अनुषेंगाने मा. महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांनी महानगरपालिकेच्या विविध संवर्गात विभागनिहाय नव्याने ५,०८४ पदे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव मे. राज्य शासनाकडे सादर केला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. प्रधान सचिव (नवि २) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकांमध्ये सर्व महानगरपालिकांचा आकृतीबंध तयार करणेबाबत सूचना/मार्गदर्शन करण्यात आले. त्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या आकृतीबंधास दिनांक २६/८/२०१४ रोजी मे. शासनाने मान्यता दिली आहे. पुणे महानगरपालिकेच्या ६४ विभागांकरिता एकूण १९८५९ मंजुर पदे अधिक ३८७७ नव्याने मंजुर पदे अशा एकूण २३७३६ पदांना मान्यता देण्यात आली आहे.

पुणे मनपाच्या आकृतीबंधास पुढील अटी शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे.

१. पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासनाच्या दिनांक १०/८/२००९ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे सहाव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणी (वेतनबँड व अनुषंगिक ग्रेड वेतन) लागू करणे.

२. पुणे महानगरपालिकेच्या सुधारित आकृतीबंधामध्ये वर्गीकरणनिहाय मंजुर केलेल्या पदसंख्येपेक्षा अधिक अधिकारी/कर्मचारी महानगरपालिकेत सध्या कार्यरत असतील तर असे अधिकारी/कर्मचारी सेवेत असेपर्यंत किंवा पदोन्नत होईपर्यंत सदर अधिकारी/कर्मचारी कार्यरत असलेली जादा पदे अस्तित्वात राहतील. तदनंतर अशी पदे आपोआप व्यपगत होतील.

३. पुणे महानगरपालिकेंतर्गत प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची तांत्रिक व लेखा सेवेतील पदावर किंवा तांत्रिक व लेखा सेवेतील अधिकाऱ्याची प्रशासकीय सेवेतील पदांवर बदलीने/प्रतिनियुक्तीने नेमणूक करता येणार नाही.

४. महानगरपालिकेच्या ज्या सेवा आउटसोर्सिंगद्वारे करणे शक्य आहे अशा सेवा (उदा. वाहनचालक, द्विनोंद लेखा पध्दती, संगणकीय डाटा संकलन, लिफ्टमन, सफाई कामगार, इत्यादी) आउटसोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात.

५. आकृतीबंधातील काही पदांची पदनामे गरजेनुसार बदलण्यात आली आहेत. त्याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

पुणे मनपा शिक्षण मंडळाच्या शासनमान्य पदांच्या आकृतीबंधाबाबत स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे सूचित करण्यात आले आहे.

पुणे मनपा आकृतीबंध मंजुर झाल्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या सद्यस्थितीतील मंजुर पदांची संख्या निश्चित झाली असून, प्रशासनास रिक्त जागा तातडीने भरणे शक्य होणार आहे. तसेच, प्रशासकीय कामकाजात गतीमानता आणण्यासाठी विविध विभागांतील पदांना मान्यता मिळाली असल्यामुळे सदर विभागही स्वतंत्ररित्या कार्य करु शकणार आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने मागासवर्ग विभाग, सेवाभरती व परीक्षा नियंत्रण विभाग, प्रशिक्षण प्रबोधिनी विभाग, देणगी विभाग, जिल्हा नियोजन व विकास समिती विकास, निविदा विभाग, वारसा व्यवस्थापन विभाग, प्रकल्प कार्यालय क्र. १, प्रकल्प कार्यालय क्र. २, दक्षता विभाग, बीओटी सेल, इत्यादी विभागांसाठी आकृतीबंधामध्ये नव्याने पदांना मान्यता देण्यात आली आहे.

सदर शासन निर्णय पुणे महानगरपालिकेच्या www.pmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## कामगार प्रशिक्षण वर्ग क्र.८९-९० चे शानदार उद्घाटन

सन २०१४-१५ मध्ये अनुक्रमे वर्ग ३ व ४ च्या सेवकांसाठी कामगार प्रशिक्षण वर्ग क्र.८९-९० चा उद्घाटन समारंभ दि.१९/८/१४ रोजी जुने कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय इमारत येथे पार पडला. प्रशिक्षण वर्गास ५७ सेवकांना प्रवेश देण्यात आला आहे. वर्ग क्र.८९ साठी श्री.विजय कांबळे व वर्ग क्र.९० साठी श्री.इसाक शेख यांची कामगार शिक्षक व समन्वयक म्हणून कामगार कल्याण अधिकारी श्री.नितीन केंजळे यांची नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमास मा.ॲड. शाम शरमाळे, अध्यक्ष, हिंदू मजदूर सभा उद्घाटक म्हणून लाभले. कार्यक्रमास मा.नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, मा. अरुण खिलारी, महापालिका सहाय्यक आयुक्त, कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालय, मा.प्रशांत एडवी, शिक्षणाधिकारी, केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ, मा. बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन उपस्थित होते.

मा. नितीन केंजळे यांनी प्रस्तावनेत कामगार प्रशिक्षण योजनेबाबत माहिती दिली. तसेच, कामगार प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यामागची भूमिका विषद करुन प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करण्याबाबत शुभेच्छा दिल्या. तदनंतर श्री. बापू पवार, श्री.विजय कांबळे व श्री. प्रशांत एडवी यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे मा.ॲड. शाम शरमाळे गेली ३०-३५ वर्षे कामगार चळवळीमध्ये असून अनेक देशांमध्ये कामगारांच्या प्रश्नासंदर्भात त्यांनी भारताचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. आपल्या भाषणामध्ये त्यांनी प्रशिक्षणार्थींना कामगारांच्या आंदोलनाबाबत माहिती दिली. तसेच, पुणे मनपालिकेतर्फे राबविण्यात येणारा कामगार प्रशिक्षण वर्ग हा उपक्रम स्तुत्य असल्याचे नमूद करुन प्रशिक्षण कार्यक्रम यापुढेही सुरु ठेवणेबाबत सदिच्छा व्यक्त केल्या.



उपस्थितांपैकी श्री. मगदूम, अन्न निरीक्षक, श्रीमती महाबळेश्वरकर, सरलेखनिक व श्रीमती चोपडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.तनुजा रावळ, कामगार शिक्षिका व आभारप्रदर्शन श्री. मधुकर बिबवे, कामगार शिक्षक यांनी केले.

## सफाई कर्मचाऱ्यांना सदनिका वाटप

डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेंतर्गत २५ वर्षे किंवा त्याहून अधिक सेवा झाली आहे त्यांना तसेच सेवेत असताना मृत्यू झाल्यास अशा सफाई कामगारांच्या निधनानंतर त्यांच्या पात्र वारसास मालकी तत्वावर मोफत सदनिका वाटपाचा सोडत कार्यक्रम दि.४/८/१४ रोजी आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमासाठी मा.चंचला कोद्रे, महापौर, मा. बंडू उर्फ सुनिल गायकवाड, उपमहापौर, मा.सुभाष जगताप, सभागृह नेता, मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी, अध्यक्ष, स्थायी समिती, मा.गणेश बिडकर, सभासद, मा.सिध्दार्थ धेंडे, सभासद, मा. सुधीर जानजोत, सभासद, मा. अरविंद शिंदे, सभासद, मा. वसंत मोरे, सभासद, मा.आबा बागुल, सभासद, मा.विकास देशमुख, महापालिका आयुक्त, मा. अनिल पवार, उप आयुक्त (समाज कल्याण) व मा. मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन उपस्थित होत्या.

मा. उप आयुक्त (समाज कल्याण) यांनी सदर योजनेची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. मा. महापौर यांचे हस्ते लाभार्थींना सदनिकांची चावी देण्यात आली. वारजे आणि हडपसर येथील एकूण १५०सेवकांसाठी सोडत काढण्यात आली.

मोफत सदनिका वितरण करणारी पुणे महानगरपालिका ही राज्यातील पहिली महानगरपालिका ठरली आहे. आतापर्यंत एकूण ३२७ कामगारांना महापालिकेकडून घरांचे वाटप करण्यात आले आहे.

## औंध क्षेत्रीय कार्यालयाचा रौप्यमहोत्सवदिन

पुणे मनपा औंध क्षेत्रीय कार्यालयास १ ऑगस्ट रोजी २५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्त औंध क्षेत्रीय कार्यालयाच्या अखत्यारित असलेल्या सर्व आरोग्य कोठ्यांमार्फत मुख्य रस्त्यांची ग्रुप स्विपींगद्वारे साफसफाई करुन घेतली. ही स्वच्छता मोहिम महिनाभर राबविण्यात आली.



औंध प्रभाग समिती अध्यक्ष मा. कैलास गायकवाड, प्रभाग समितीचे सर्व विद्यमान सभासद, मा. श्री. सुनिल केसरी, उप आयुक्त (वि.का.क्र.१), मा. नितीन उदास, महापालिका सहाय्यक आयुक्त, श्री. मधुकर कारकुड व श्री. संजय धनवट, आरोग्य निरीक्षक, श्री. श्रीकांत चव्हाण, श्री. अनिल डमाले, श्री. एस.एस.कलढोणे, सौ. लक्ष्मी गवारी, सौ. जया सांगडे यांचे मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहिम सुरु करण्यात आली.

दिनांक १ व २ ऑगस्ट, २०१४ रोजी दिवसभर आसपासच्या परिसरात दोन टन कचरा, ४ ट्रक राडारोडा, इत्यादी उचलण्यात आला. मुख्य चौक व फुटपाथ स्वच्छ करण्यात आला.

## मेरे दिलसे सुन - ध्वनीफितीचे प्रकाशन

पुणे महानगरपालिकेच्या उप आयुक्त (ज) विभागातील ज्युनिअर ग्रेड लेखनिक श्री. अशोक धर्मा लांडगे यांनी निर्मिती केलेल्या मेरे दिलसे सुन या हिंदी गीतांची ध्वनीफित असलेल्या अल्बमचा प्रकाशन समारंभ दिनांक ९/८/२०१४ रोजी संपन्न झाला.

कार्यक्रमाचे आयोजन स्वरगंधार, संगीत व साहित्य प्रसार संस्था, पुणे यांच्या वतीने ना.सी.फडके सभागृह येथे करण्यात आले.

ज्येष्ठ संगीतकार व व्हायोलिनवादक मा. प्रभाकर जोग यांचे हस्ते सदर ध्वनीफितीचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी ज्येष्ठ कवी व गझलकार मा. रमण रणदिवे, पुणे महानगरपालिकेचे माजी सहमहापालिका आयुक्त मा. अरुण पाटील, लेखक व विचारवंत मा. अद्वैत धर्माधिकारी, पुणे महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी मा. संजय मोरे, तसेच स्वरगंधार संस्थेचे अनेक सदस्य, मनपा अधिकारी, कर्मचारी, श्री. अशोक लांडगे यांचे कुटुंबिय, नातेवाईक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अल्बमचे प्रकाशनानंतर मा. प्रभागर जोग यांनी मार्गदर्शन करताना श्री अशोक लांडगे यांनी संगीत क्षेत्रात अनेक वर्षे प्रामाणिक राहून सेवा केली आहे. या क्षेत्रातील मिळविलेल्या अनुभवातून त्यांनी स्वत:च गीत रचना, संगीत संयोजन करुन अतिशय स्तुत्य व श्रवणीय ६ हिंदी गीते अतिशय उत्कृष्टरित्या निर्मिती केली असल्याचे सांगितले.

मा. रमण रणदिवे यांनी अलिकडच्या काळातील गीते ही लक्षात राहणे अवघड आहे. संगिताकरिता अनेक वाद्ये, आधुनिक प्रकार उपलब्ध झालेले आहेत. परंतु मनाची पकड घेईल असे गीत ऐकावयास मिळत नाही. याउलट १९६०-७० च्या दशकातील अथवा त्यापूर्वीच्या गीतरचना आजही रसिकांना आवडतात. रसिकांच्या मनावर अधिराज्य करताना आजही दिसतात. त्यांचे सर्व श्रेय तत्कालीन गीतकार, संगीतकार व गायक यांना जाते.

निर्मितीविषयी मनोगत व्यक्त केले. तसेच, श्रोतावर्गाचे आग्रहास्तव अल्बममधील गीते अतिशय प्रभावीपणे सादर केली.

मा. अरुण पाटील व मा. संजय मोरे यांचीही या प्रसंगी समयोचित भाषणे झाली.



श्री. अशोक लांडगे यांनी निर्मिती केलेली ध्वनिफित अतिशय उत्कृष्ट व श्रवणीय असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी अल्बमचे निर्माते गायक, गीतकार व संगीतकार श्री. अशोक लांडगे यांनी या

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वरगंधार संस्थेचे अध्यक्ष श्री. गोपाळ कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन कार्याध्यक्ष श्री. सागर गायकवाड यांनी केले.

# प्रशासकीय पत्रव्यवहार

महापालिकेमध्ये सर्व खात्यांचा पत्रव्यवहार हा सुरळीत व नियमबध्द होण्यासाठी प्रशासकीय निवेदने/पत्र/कार्यालय परिपत्रके/अर्ज इत्यादींमधील भाषा तसेच लेखन पध्दतीमध्ये प्रशासकीय शब्दांचा, नियमांचा अचूक वापर करणे महत्वाचे असते. कोणत्याही कार्यालयाचा पत्रव्यवहार हा त्या खात्यातील कामकाजाचा आरसा असतो. प्रशासकीय लेखन करताना आपणाला ज्या कामासाठी पत्रव्यवहार करावयाचा आहे त्याबाबतची इत्तंभूत माहिती, नियम, मान्यता, निर्णय, आदेश, इत्यादी सर्व बाबी नमूद करुन योग्य शब्दांमध्ये मांडणी करणे आवश्यक असते.

सद्यस्थितीत अनेक खात्यांकडील पत्रव्यवहार विचारात घेता पत्र कोणास पाठवावयाचे आहे, कोणामार्फत कोणास पाठवावयाचे, ज्या बाबी पत्रामध्ये नमूद करावयाच्या आहेत त्याची खातरजमा करणे, विषयाबाबत कोणते नियम आहेत ते नमूद करणे, वरिष्ठांना पत्रव्यवहार करताना विहित कार्यपध्दतीनुसार (पदसाखळीनुसार) करणे, व्याकरणातील चुका/शब्दातील चुका, नियमातील बदल, आवश्यक पूर्वमान्यता, पूर्वअभिप्राय, प्राधिकृत अधिकाऱ्याची मान्यता, इत्यादी बाबी विचारात न घेता पत्रव्यवहार केला जातो. त्यामुळे बहुतांश प्रकरणे परत पाठविली जातात, आक्षेप काढले जातात, यास्तव प्रशासकीय कामकाजाचा वेळ व आर्थिक नुकसान होते.

महापालिकेतील बहुतांश पत्रव्यवहार हा ज्युनिअर ग्रेड लेखनिक, सिनिअर ग्रेड लेखनिक, सरलेखनिक, कार्यालय अधिक्षक,अधिक्षक यांचेमार्फत केला जातो. तर टेंडर प्रक्रियेबाबतचा, तांत्रिक बाबींबाबत पत्रव्यवहार हा अभियंता संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांमार्फत केला जातो. प्रशासकीय पत्रव्यवहार करताना लेखनिकी/अभियांत्रिकी संवर्गातील सेवकांना खूप महत्व आहे. लेखनिकी तसेच अभियांत्रिकी संवर्गातील सेवकांवर प्रशासकीय कामकाजाचा वेग वाढविणे किंवा वेळेत काम पूर्ण करणेबाबत जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यामुळे लेखनिकी/अभियंता संवर्गातील सेवकांनी त्यांची निवेदने/पत्रव्यवहार करताना उपरोक्त आवश्यक बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. उपरोक्त बाबी विचारात घेतल्यास कोणतेही निवेदन किंवा प्रस्ताव हा सत्वर मान्य होण्यास व प्रकरणी निर्णय घेण्यास सहाय्यभूत ठरतात. तसेच, आपण केलेल्या कामाचे वेळेत निर्णय झाल्याने आपणासही त्या कामाचे समाधान प्राप्त होते.

प्रशासकीय पत्रव्यवहार प्रशासकीय भाषेत व नियमानुसार करण्यासाठी पुणे महानगरपालिकेमध्ये अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, पुणे मनपा सेवा विनियम, पेन्शन नियम, किमान वेतन अधिनियम, वेतन प्रदान अधिनियम, सेवा वर्तणूक नियम, संबंधित कामासंबंधीचे नियम, विविध कार्यालय परिपत्रके, आधारभूत निर्णय, शासन निर्णय, इत्यादींचे वाचन करणे आवश्यक आहे. जे काम आपणाकडे सोपविले आहे त्या कामाबाबतची संपूर्ण माहिती कशा पध्दतीने उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न करणे, ती माहिती संकलित करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय पत्रव्यवहारासाठी कोणतेही निवेदन किंवा पत्र तयार करताना कामाचे स्वरुप, कामाची गरज, खात्याचे स्पष्टीकरण, नियमांचा आधार, आर्थिक तरतुद, पूर्वमान्यता (आवश्यक असल्यास), आवश्यक प्राधिकृत अधिकाऱ्याची मान्यता आणि सर्वात शेवटी मान्यतेचा प्रस्ताव या पध्दतीने पत्राची मांडणी केल्यास मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्यास तसेच इतर कोणत्याही कर्मचाऱ्यास प्रस्तावाचे स्वरुप तात्काळ लक्षात येवू शकते. पत्र मुद्देसूद व क्रमनिहाय केल्यास त्यामध्ये सेवकाचे व खात्याचे नाव देखील उंचावते.

कोणत्याही कामाबाबत निवेदन/प्रस्ताव लिहिताना प्रकरणाच्या मुळापासून वाचन केल्यास निवेदनाचे मुद्दे आपोआप आपल्या लक्षात येतात. तेंव्हा प्रशासकीय नस्तीचे वाचन करणे तितकेच महत्वाचे आहे.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेवून प्रशासकीय निवेदने/पत्रव्यवहार केल्यास त्याचा फायदा आपोआपच आपल्या कामास, संस्थेस तसेच आपला आत्मविश्वास उंचविण्यात होतो.

# ओळख गुणवंताची - श्रीमती रतन धिमधिमे

ओळख गुणवंताची या सदरात आपण श्रीमती रतन धिमधिमे झाडुवाली, टिळकरोड क्षेत्रीय कार्यालय यांची ओळख करुन घेणार आहोत.

श्रीमती रतन धिमधिमे यांचा जन्म एका खेडेगावी झाला. आई वडिल अशिक्षित असल्यामुळे त्यांचेही शिक्षण झाले नाही. घरची परिस्थिति अत्यंत बेताचीच. त्यातच दुष्काळ पडला. त्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांच्या कुटुंबाने पुण्याची वाट धरली व ते पुण्यात स्थायीक झाले.

आई वडिलांनी लहान वयातच श्रीमती धिमधिमे यांचे लग्न लावून दिले. लग्न म्हणजे काय हे कळायचे देखील त्यांचे वय नव्हते. त्यांना दोन मुली व एक मुलगा अशी तीन अपत्ये झाली. मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर वाढली. त्यांच्या पतीला दारुचे व्यसन असल्याने त्यांची संसारात काहीच मदत होत नव्हती.

आता मात्र बिचारी म्हणून जगण्यापेक्षा कष्ट करुन, मोलमजुरु करुन जगणे बरे असा निर्धार त्यांनी केला. मुलांच्या शिक्षणासाठी कंबर कसून उभ्या राहिल्या. पडेल ते काम करण्याची जिद्द ठेवली. गवंड्याच्या हाताखाली बिगारी म्हणून त्या काम करु लागल्या. विटभट्टीवर मातीचा गारा तयार करुन विटा थापण्याचे काम त्यांनी केले. शेतीमध्ये खुरपण्याचे काम केले. मंगल कार्यालयामध्ये भांडीधुण्यापासून ते स्वयंपाक करणे, पुऱ्या लाटणे अशी कामे त्या करु लागल्या. रिकाम्या दुधाच्या पिशव्या फाडून भंगारवाल्यांना ५० पैसे किलोप्रमाणे विकण्याचे काम केले. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या काळात प्लास्टिक वायरपासून हार तोरण तयार करुन विकले. नवऱ्याची कसलीही साथ नसताना कोणापुढे कधीही त्यांनी हात पसरला नाही.

श्रीमती धिमधिमे जरी अशिक्षित असल्या तरीही त्यांना व्यवहाराचे चांगले ज्ञान आहे. त्यांनी विचारपूर्वक निश्चय केला की बचत करुन मुलांचे शिक्षण करणार. आपण स्वत: अशिक्षित असलो तरीही मुलांना शिकविणार. यासाठी मिळणाऱ्या पगारातून वाचलेले पैसे नवऱ्याला चोरुन गाडग्यात ठेवून गाडगे मातीत पुरुन ठेवत. उपासमार करुन पोटाला मारुन बचत केली. हळूहळू शेजारच्या महिलांना संगठित करुन भीशी चालू केली. अशाप्रकारे बचत करुन शिक्षणास हातभार लागला.

जून १९९२ साली श्रीमती धिमधिमे यांची पुणे मनपामध्ये खाडे रोजंदारी बिगारी पदावर नेमणूक झाली. महिन्यातील कधी एक दिवस तर कधी दोन दिवसच भरत असत. सन १९९९ मध्ये त्या कायम झाल्या.

सन २००१-०२ मध्ये जनता वसाहत येथे काम करत असताना वस्तीतील काही गुंडांनी कोठी अधिकारी श्री. सावंत यांना धक्काबुक्की व शिवीगाळ केली. श्रीमती धिमधिमे यांनी कोठीवरील कामगारांना



**श्रीमती रतन धिमधिमे**
**टिळकरोड क्षेत्रीय कार्यालय**

विश्वासात घेवून तीन दिवस धरणे आंदोलन केले. ही बाब क्षेत्रीय अधिकारी मा. मोळक साहेब यांना कळताच त्यांनी सदर गुंडांवर कारवाई केली. श्रीमती धिमधिमे यांच्या या धडाडीमुळे पुणे मनपा कामगार युनियनच्या सरचिटणीस मा. मुक्ता मनोहर यांनी टिळकरोड क्षेत्रीय कार्यालय येथे युनियन प्रतिनिधी सचिव या पदी त्यांची नेमणूक केली.

श्रीमती धिमिधिमे यांना पदाची अपेक्षा नाही तर त्यांना काम महत्वाचे आहे. पुणे मनपा ही माझी संस्था असून, मी एक सफाई सेविका म्हणून काम करत असल्याचा त्यांना अभिमान आहे.

सन २००९ मध्ये सकाळी दत्तवाडी पोलिस चौकीशेजारी झाडणकाम करत असताना एक महिला रस्त्यातच प्रसूत होत असताना त्यांनी पाहिली. पाहताच प्रथम त्यांनी त्या महिलेला धीर दिला व धावत किराणा मालाच्या दुकानातून दोन कॅरीबॅग व एक नवीन ब्लेड घेतले. तोपर्यंत बाळ टॉयलेटच्या भांड्यात पडले होते. कॅरीबॅग हातात घालून ब्लेडने बाळाची नाळ कापली व बाळ भांड्यातून बाहेर काढले. अशा प्रकारे दोन्ही जीव वाचविण्याचे कार्य त्यांनी अतिशय धाडसाने केले.

टिळकरोड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत अनेक सोसायट्यांमध्ये भेट देवून बंद पडलेले गांडूळ खत प्रकल्प पुन्हा चालू करुन ओला कचरा जिरविण्याचे कार्य केले. शाळांमध्ये जावून प्रार्थनेच्या वेळी विद्यार्थ्यांना स्वच्छतेविषयी पथनाट्याद्वारे प्रबोधन केले. आपल्या या कार्यामध्ये मा. मुक्ता मनोहर यांचा मोलाचा वाटा असल्याचे त्या अभिमानाने सांगतात.

आज श्रीमती धिमधिमे यांची मुले सुशिक्षित व मोठ्या पदांवर काम करत आहेत, याचे त्यांना अतोनात समाधान आहे.

श्रीमती धिमधिमे यांच्या आजवरच्या कार्यामुळे त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. पुणे महानगरपालिका कामगार कल्याण निधीतर्फे त्यांना सन २०१०-११ चा गुणवंत कामगार पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सन २०११-१२ मध्ये मा.मुक्ता मनोहर यांचे हस्ते कार्यकर्ता सन्मान पुरस्कार मिळाला. दि.२६/२/११ रोजी पी.एम.शहा फौंडेशनतर्फे आयोजित महिला आरोग्य हक्क परिषदेत ॲड. चेतन गांधी यांचे हस्ते मानपत्र देवून त्यांना सन्मानित करण्यात आले.

सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयातील झाडुवाला सेवकास नागरिकांनी मारहाण केली असता सदर प्रश्न त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे हाताळल्याबद्दल वरिष्ठ पोलिस अधिकारी यांनी त्यांचा सन्मान केला.

अशा प्रकारे श्रीमती धिमधिमे यांचे कार्य खरोखर गौरवास्पद असून, त्यांच्या भविष्यकालीन वाटचालीस कामगार कल्याण निधीतर्फे हार्दिक शुभेच्छा.

## तु दिसलीच नाही

प्रेमाच्या वाटेतून तुझे
अचानक निघून जाणे
मला समजलेच नाही ।।
नयनांत सदैव असावे तसे
तुझ्या आठवणींचे ठसे
मनातून गेलेच नाही।।
मृगाप्रमाणे वणवण
तुझा शोध घेत राहिलो।।
पण चुकूनही कधी
तु परत दिसलीच नाही।।

## आई

पावसाळ्याचे दिवस होते. पावसाने राज्यात थैमान घातले होते. जणू ढगांना झालेल्या कसल्यातरी दु:खामुळे ढग जोरजोरात रडत होते. पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या. घरातून बाहेर निघायची सोय नव्हती आणि अशा परिस्थितीत अजय आणि मेघा त्यांच्या चारचाकी कारने घरी निघाले होते. पावसामुळे समोरचे काही दिसत नव्हते. म्हणून अजय कार हळू चालवत होता. दोघांना घरी पोहचायला उशीर होणार होता आणि पाउस त्यांच्या वाटेत अजून बाधा घालत होता. दोघेही वैतागलेले होते. पण निसर्गापुढे आजपर्यंत कोणाचे काही चालले आहे का हळूहळू रात्र झाली होती. ढगाळलेल्या वातावरणामुळे काळोख अगदी गडद झाला होता. आता सरळ रस्ता संपून घाट उतार सुरु झाला होता आणि अजय देखील कार सावधानतेने चालवत होता. मध्येच काळ्या अंधाराला चिरत एखादी वीज जणू पावसाच्या प्रचंडतेची जाणीव अजय आणि मेघाला करुन देत होती. पावसाळ्याचे दिवस चालू असल्याने गाड्यांचा वावर देखील कमी झाला होता. घाट उतारावरील एका वळणावर अजयने गाडीला जोरदार ब्रेक लावला. जोरदार आवाज झाला. कार थोडी घसरली. त्या धक्क्याने कारच्या हेड लाईट बंद पडल्या. कार देखील घाटाच्या मध्यावर बंद पडली. मेघाला क्षणभर सुचलेच नाही काय झाले ते. ती कावरी बावरी होवून अजयवर ओरडली. पण अजयला काळोखात जे दिसलं ते मेघाच्या डोळ्यांनी पाहिलं नव्हतं आणि चमकणाऱ्या विजांच्या पांढऱ्या प्रकाशात त्याला एक बाई त्याच्या कारच्या पुढे उभी असलेली दिसली. अंगावरील कपडे फाटली होती, डोक्यातून रक्त येत होते, हात पाय रक्ताने माखले होते, जणू त्या बाईचा आताच अपघात झाला होता. ती बाई कारपासून थोड्या अंतरावर उभी होती. आता तर मेघाचे देखील तिच्याकडे लक्ष गेलं आणि भीतीपोटी मेघाच्या तोंडून मोठी किंकाळी निघाली. ती प्रचंड घाबरली होती. अजय तिला समजावत होता पण तिचे घाबरणे कमी होत नव्हते. तिला धाप लागली होती. ती बाई धावतच अजयच्या कारजवळ आली. मेघाने झटपट खिडक्यांच्या काचा वर घेतल्या. इतक्यात त्या बाईचे रक्ताने माखलेले हात कारच्या काचेवर रेंगाळू लागले. अजय देखील मनातून घाबरला होता. त्याने कार चालू करण्याचा खूप प्रयत्न केला पण कार चालू झाली नाही. त्या बाईचे रक्ताने माखलेले हात काचेवरती फिरताना पाहून मेघा घाबरली होती. तिला सावरणे अजयसाठी कठीण झाले होते. इतक्यात अजयचे लक्ष त्या बाईच्या हातांकडे गेले. त्या बाईचे दोन्ही हात अजय आणि मेघासमोर जोडले गेले होते जणू ती बाई मदत मागत होती. अजयने मनाशी काहीतरी विचार केला आणि कारमधून घाबरतच बाहेर पडला. मेघादेखील त्याच्या पाठोपाठ कारमधून उतरली. इतक्यात त्या बाईने अजयचे पाय पकडले आणि रडू लागली. रडत रडत बोलू लागली, माझा अपघात झाला आहे आणि माझी गाडी दरीत अडकली आहे. माझा ४ वर्षांचा मुलगा त्या गाडीत अडकला आहे. कृपया तुम्ही त्याला वाचवा ना आणि पुन्हा रडू लागली. मेघाला मात्र हा भलताच प्रकार वाटू लागल्याने मेघा खूप घाबरली आणि अजयला तिथून निघून जावू असे म्हणू लागली. पण अजयने त्या बाईला मदत करण्याचं पक्कं केलं होतं. तो त्या बाईला म्हणाला, चला ताई, दाखवा मला कुठे आहे तुमची कार, मी करतो तुम्हाला मदत आणि ती बाई पुढे चालू लागली. तसे तिच्या पाठी अजय आणि मेघा देखील चालू लागले. ते दोघेही दरीच्या एका उंच कड्यावर पोहचले. अजयला तिथून रडणाऱ्या बाळाचा आवाज स्पष्ट येत होता. वरुन पावसाची तिरीप डोळे उघडायची संधी देत नव्हती. अशा मुसळधार पावसात अजय त्या छोट्या जीवाचे प्राण वाचवण्यासाठी स्वत:चे प्राण धोक्यात घालून एक एक पाउल दरीत उतरत होता. दरी खोल अशी नव्हती पण तरी जीवघेणी मात्र नक्कीच होती. अजय जसजसा त्या कारच्या खिडकीजवळ आला होता. त्याला ते मुल तिथे रडताना दिसत होते. त्याने जवळून अंधारात चाचपडत एक दगड उचलला आणि खिडकीची काच फोडून त्या मुलाला बाहेर काढले. ते मुल देखील अजयच्या हातात येताच रडायचे शांत झाले. अजयने त्याला दरीतून बाहेर काढताना त्याला कारच्या चालकाच्या जागेवर कोणतरी असल्याचे जाणवले म्हणून त्याने त्या मुलाला दरीतून बाहेर काढून मेघाजवळ सोपवून तो पुन्हा त्या दरीत अडकलेल्या गाडीत नक्की काय आहे ते पाहण्यासाठी दरीत पुन्हा उतरु लागला. कारजवळ गेल्यावर त्याने त्या अपघातग्रस्त कारमध्ये चालकाच्या सीटवर नीट पाहिले. त्याने जे पाहिले त्याच्या ह्दयाला धक्का देणारे होते. त्या सीटवर एका बाईचा मृतदेह पडला होता. अजयने नीट पाहिले तेंव्हा तो मृतदेह त्याच बाईचा होता जि त्यांच्याकडे तिच्या मुलाचे प्राण वाचवण्यासाठी मदत मागायला आली होती. त्याने कसलाही विचार आणि बोभाटा न करता दरीतून काढता पाय घेतला. दरीतून वर आल्यावर मेघाने आजूबाजूला पाहिले आणि अजयला विचारले की, कोण होती ती बाई, ती तुझ्याच मागे आली होती, अचानक कुठे गेली, यावर अजयने एकच उत्तर दिले.. ती एक आई होती...

## सजणी

एके संध्याकाळी
नजरेस तु पडली
काय सांगू सजणी
प्रीत मजला जडली ।।
भेटू कसे तुला
चिंता मज ही पडली
शुध्द गेली हरपुनी
झोप माझी उडाली ।।
आनंद गगनात मावेना
जेव्हा मज हे समजले
प्रेमवेडी तु ही
प्रेमात माझिया पडली ।।
बाहूंत पडोनी जेव्हा
दु:खात माझिया रडली
प्रेम आले दाटूनी
माया अधिक उजळली ।।
भटकत होतो एकला
जीवनाच्या अंधारात
ज्योत प्रेमाची घेवूनी
सजणी तु सापडली ।।

# माहे जुलै, २०१४ सेवापूर्ती समारंभ संपन्न

दि.३१/७/१४ रोजी कॅ. वडके हॉल येथे जुलै,१४ मधील सेवानिवृत्त ४० अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये २४ वयपरत्वे



व १६ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मा. अनिल पवार, उप आयुक्त (वि) उपस्थित होते. तसेच, मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, मा. बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, श्री. दिलीप बागल, अध्यक्ष, अर्बन को-ऑप.बँक व सेवानिवृत्त सेवक संघाचे सचिव श्री. बाबा शेख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. नितीन केंजळे यांनी केले. प्रास्ताविकामध्ये सेवानिवृत्तीनंतर सेवकांना कोणकोणत्या बाबी करता येतील याबाबत मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये यशस्वीरित्या सेवा पार पाडल्याबद्दल सर्व सेवानिवृत्तांचे अभिनंदन केले. यापुढे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपल्या सर्व अमूर्त इच्छा आकांक्षा पूर्ण कराव्यात, चांगले छंद जोपासावेत, पर्यटन करावे, असे सांगितले. तसेच, मिळालेल्या पैशाचा विनियोग उत्तमप्रकारे करावा, अशी सूचना केली. सर्वांना निरोगी आयुष्य, कॉटुंबिक जिव्हाळा लाभून त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण व्हाव्यात, अशी परमेश्वरचरणी इच्छा व्यक्त करुन या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. अशा प्रकारे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन प्रमुख पाहुण्यानी केले.

तदनंतर मा. बापू पवार यांनी सर्व सेवानिवृत्तांना त्यांनी केलेल्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या सर्व अपूर्ण इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा, असे सांगितले.

मा. दिलीप बागल यांनी सर्व सेवानिवृत्तांना सेवापूर्तीनिमित्त शुभेच्छा दिल्या. मिळालेला पैसा पुणे अर्बन को ऑप बँकेत गुंतवावा कारण ती आपल्या सेवकांचीच बँक असल्याने त्यात सुरक्षिततेची हमी असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर सेवानिवृत्तांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौ.अलका जोशी यांनी केले. कार्यक्रम आयोजनात श्री.राजपुरे, श्री.गेजगे, श्री.मरकड यांनी विशेष परिश्रम घेतले.

# माहे ऑगस्ट, २०१४ सेवापूर्ती समारंभ संपन्न

दि.३१/८/१४ रोजी कॅ. वडके हॉल येथे ऑगस्ट,१४ मधील सेवानिवृत्त ३० अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये १६ वयपरत्वे व



१४ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मा. जगन्नाथ लडकत, सरव्यवस्थापक, पुणे म्युनिसिपल अर्बन को-ऑप बँक उपस्थित होते. तसेच, मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, मा. बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन व सेवानिवृत्त संघाचे सचिव श्री. बाबा शेख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. नितीन केंजळे यांनी केले. प्रास्ताविकामध्ये सेवापूर्ती समारंभ आयोजनाचे महत्व विषद करुन सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

प्रमुख पाहुणे यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये सर्वांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्तीनंतर सर्वांशी प्रेमाने वागावे, नियमित व्यायाम करावा, स्वत:चा दिनक्रम व्यस्त ठेवावा, कुटुंबातील सदस्यांसोबत ऋणानुबंध दृढ करावेत, नातवंडांवर चांगले संस्कार करावेत असे सांगितले. यापुढे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपल्या सर्व अमूर्त इच्छा आकांक्षा पूर्ण कराव्यात, आरोग्याकडे लक्ष द्यावे, मिळालेल्या पैशाची गुंतवणूक योग्य ठिकाणी करावी, अशा सूचना केली.

तदनंतर मा. बापू पवार सेवानिवृत्तीनंतर मिळालेल्या रकमेचा योग्य विनियोग करावा. आपल्या सर्व अपूर्ण इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा, असे सांगितले.

त्यानंतर सेवानिवृत्तांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौ.अलका जोशी यांनी केले. कार्यक्रम आयोजनात श्री. काळे, श्री.गेजगे, श्री.मरकड यांनी विशेष परिश्रम घेतले.


कल्याणवार्ता.
जुलै व ऑगस्ट, २०१४
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार)
कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५१/१२५३/१२५५
ईमेल आयडी
shivaji.daundkar@punecorporation.org


# ते दिवस - गुलजार

यशाचे किंवा अपयशाचे अनुभव कुठल्याही माणसाला बालपणापासून येत असतात. अपयशामुळे नैराश्य येणार. पण नैराश्य नाही आलं तर आपल्याला अगदी बथ्थड आणि संवेदनाशून्यच म्हणावं लागेल. खरा अनुभव तोच की जो आपल्या मनावर खोल परिणाम करुन जातो. या नैराश्याचे परिणाम सकारात्मक होतात किंवा नकारात्मकही होवू शकतात. यश नाही मिळालं तर आत्महत्या करणं हा नकारात्मक परिणाम आहे. चांगले किंवा अपेक्षित मार्क नाही मिळाले तरी काही मुलं आत्महत्या करतात असं आपण बघतो किंवा वाचतो. पण अपयशानं खचून न जाणं, जिद्दीनं आव्हान स्विकारणं व कुठलीही अडचण मी पार करीन असा विश्वास निर्माण होणं हेदेखील अपयशाचेच परिणाम आहेत ना. अशा आव्हानांतून माणूस घडत जातो. जीवनात अपयश तर अनेक ठिकाणी, अनेक रुपात भेटतं. शैक्षणिक अपयश हा त्या अपयशाचा एक थोडा भाग आहे. शाळा कॉलेजात अपयश का येतं, त्याचं कारण अगदी सोपं आहे. त्या मुलाची आवड काही वेगळीच आहे, त्याचं लक्ष वेगळीकडेच आहे आणि त्याच्यावर अभ्यास मात्र लादला जातोय तो वेगळ्या गोष्टीचा. मग अपयश येणार नाही, तर दुसरं काय होणार? अर्थात शैक्षणिक अपयशाला बरेचदा घरचा दबदबा हे महत्वाचं कारण असतं. माझ्या बाबतीत तसंच घडलं. मला शिकायचं होतं, खूप खूप वाचायचं होतं, साहित्याची मला खूप आवड होती. पण घरच्यांची अपेक्षा होती की मी सी.ए.बनावं. पण मी गणितात कच्चा होतो, आकडेमोडीत माझं मन रमत नव्हतं. गणिताचा पेपरच नसावा असं मला वाटे कारण त्यात पास होण्याइतके मार्क मिळताना माझी दमछाक होत असे. पण घरच्यांची विशेषत: मोठ्या भावाची जिद्द होती की मी सी.ए.बनलं पाहिजे. नाहीतर न शिकता सरळ घरच्या दुकानात बसावं असं त्याचं म्हणणं होतं. तो स्वत: पदवीधर होता, सर्व भावंडांना शैक्षणिक मार्गदर्शन त्याच्या परीनं तो करत होता. आमच्या वडिलांना बिचाऱ्यांना काहीच कळत नव्हतं. मी मात्र गणिताच्या अभ्यासानं अगदी उबून गेलो होतो, हैराण झालो होतो. पण वडिलांना निराश करायचं नव्हतं, त्यांना दु:खी करायचं नव्हतं. हेच दडपण मला आलं होतं. कॉलेजमधल्या गणिताच्या परीक्षेला मी बसलोच नव्हतो. त्यामुळे फ्लूक लागायचा चान्स नव्हता. परीक्षेला बसलोच नाही तर पास काय होणार? मग रिझल्टच्या दिवशी मी चक्क घरी लाडू घेवून गेलो. कुणी विचारलं की सांगायचो, "रिझल्ट लागलाय, हा घ्या लाडू." आता दुसरं काय करणार होतो मी?

पूर्वी पालक किंवा घरातली ज्येष्ठ मंडळीच मुलांच्या करिअरचे निर्णय घ्यायची. तू नेव्हीत जा, तू कॉस्टींग कर, तु डॉक्टर हो, असं ठरवायची. माझे सगळे भाउ शिकलेले. कॉलेजात यशस्वी झालेले. तसं पाहिलं तर मीही पुस्तकं वाचताना सगळ्यांनी पाहिलं होतं. त्यामुळे मी नापास कसा होतो याचच मोठ्या माणसांना आश्चर्य वाटे. दोन वेळा प्रयत्न केला पण कॉलेजचं गणित काही मी पार करु शकलो नाही. मी फार ब्रिलियंट विद्यार्थी नव्हतो. पाठांतर करुन, ठोकून ठाकून मॅट्रिक पास झालो. सेकंड क्लास मिळाला. आजकाल हा ताण फारच आहे. पर्सेंटेजला खूप म्हणजे खूप महत्व आलंय. शाळेत असल्यापासूनच साहित्याची खूप आवड निर्माण झाली. कादंबऱ्या वाचायचो. मॅट्रिकला येईतो मी शरत्‌चंद्र, टागोर यांचं भाषांतरीत साहित्य वाचून काढलं होतं. प्रेमचंद सगळं वाचून झालं होतं. माझ्या वाचनाची सुरुवात झाली सातवी आठवीपासूनच. आठवीतही मी उर्दूत नापास झालो होतो. सुरुवातीला गुप्तहेर कथापासून सुरुवात झाली. सुलताना डाकूच्या रोमहर्षक कहाण्या वाचल्या. पण तिथून मग आपोआपच अभिजात साहित्याकडे वळलो. मोठे भाउ बी.ए., एम.ए. झालेले होते. त्यांच्या पदवीच्या अभ्यासाला लावलेली चांगली पुस्तकं त्यांच्या शेल्फात असत. ती मी मॅट्रिकला असतानाच वाचून काढली. त्यांच्या शेल्फांतून ढापलेली उर्दूमधील दोन पुस्तकं आजही माझ्या संग्रही आहेत. चांगलं साहित्य म्हणजे काय ह्याची जाण त्या पुस्तकांतून मला झाली. बालपणी काही वाईट सवय होती का असं सर्वजण विचारतात, त्याबद्दल मी सांगेन की, बालवयात मला चोरी करायची सवय लागली ती अशी, म्हणजे मी फक्त भावांची पुस्तकं चोरायचो, बाकी काही नाही. मला शाळेतून घरी आलं की दुकानात बसावं लागे. तेंव्हा काही वीज नव्हती. कंदिलाच्या उजेडात मी गिऱ्हाईक नसताना वाचत बसे. भावांच्या कपाटातून चोरलेली पुस्तकं किती काळ पुरणार? मग मी लायब्ऱ्या शोधून काढल्या. रस्त्याच्या कडेला लाकडी बाकड्यांवर बऱ्याच पुस्तकांचा खजिना तेथे असे. जुनी-नवी, जास्त करुन जुनीच पुस्तकं तिथं असत. एक आणा दिला की त्या खजिन्याचं दार उघडत असे. अर्थात एक आणा ही रक्कम त्या काळी बरीच मोठी होती.

कॉलेजमध्ये मी डिकन्स वाचला. थॉमस हार्डी हा तर माझा खूप आवडता लेखक होता. अजूनही आहे. आमच्या वेळची शिक्षणपध्दती ही ठोकळ्यासारखी होती, शिवाय आईवडिलांशीही संवाद कमी होता. त्या मानाने मला वाटतं की आजची मुलं नशीबवान आहेत. या मुलांचे पालक जाणकार आहेत, या मुलांना एक्सपोजरही चांगलं मिळतं. आपल्याला काय करायचं आहे हे त्यांना कळतं आणि त्या दिशेने ती चालत असतात. एखादा मुलगा शाळेत फेल झाला असं म्हटलं की मला आश्चर्य वाटतं. शाळेतलं मुल नापास होतो हा खरा तर शिक्षणपध्दतीचा दोष आहे असं मला वाटतं. हे मुलांचं शिकण्याचं वय आहे. परीक्षा खरी तर शिक्षकांचीच असते. तुम्ही शिकवलं ते मुलांनी किती आत्मसात केलं हाच प्रश्न खरा आहे. मुल नापास होतं म्हणजे शिक्षकांच्या 'माथा आळ लागे' असं मला वाटतं.

शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन एकांगी असला की असं होणारच. माझ्या मते कुठलंही मुल नापास होवू शकत नाही. कुणाचं लक्ष चित्रकलेत असतं तर कुणाचं खेळात असतं. फक्त त्यांचे गुणमापन करणारी परीक्षा पध्दतीच तोकडी पडते. त्यामुळे मुलं नापास होतात. मी फेल झालो त्यात माझ्या गुरुंचा व शिक्षणपध्दतीचा दोष नाही. मीच फेल झालो हे मी इथं नम्रपणे नमूद करतो. आमच्या पालकांच्या तीन महत्वाकांक्षा असत. पोरानं डॉक्टर, इंजिनियर किंवा वकील बनावं. या तिघांचीही काय हालत आहे ते आपण पाहातोच. ज्या क्लबात मी जातो तिथं डेंटीस्ट येतात. त्यांची संख्या बत्तीसपेक्षाही जास्त आहे. तोंडातले बत्तीस दात धरले तर प्रत्येक डॉक्टरगणीक एक दातसुध्दा येणार नाही. हल्ली मुलांसमोर खूप विकल्प असतात. परीक्षेत शहाण्णव किंवा सत्त्याण्णव टक्के मिळूनही हवा तो कोर्स मिळत नाही, हवा तो विषय मिळत नाही याला काय शिक्षण म्हणायचं का? अशा वेळी निराश न होता दुसरा विकल्प तयार ठेवला पाहिजे. माझ्या एक परिचित बाई आहेत, समुद्राच्या आतील सृष्टी पाहण्यासाठी त्या सबमरीनमधून मुलांना समुद्राच्या तळाशी घेवून गेल्या होत्या. प्रत्यक्ष पाहिलेलं ते जीवन मुलं कधी विसरणार नाहीत. प्रत्यक्ष अनुभव हेच खरं शिक्षण आहे. टेक्स्टबुक आयुष्याच्या शिक्षणासाठी केवळ मदत करतं. अनुभवातून मिळणारा धडा शिकण्यासाठी, लक्षात ठेवण्यासाठी, त्यांची नोंद ठेवण्यासाठी शाळेतलं पुस्तक कामी येतं.

शाळेत मी निबंध लिहायचो पण ते सारे पुस्तकी असत.गांधींचं सारं जीवन शिक्षण होतं. दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेषाविरुध्दचा लढा हे शिक्षण होतं. नेहरुंनी इंदिरा गांधींना तुरुंगातून पत्रं लिहिली,त्यात त्यांचा जीवनानुभव लिहिला. हे सगळे अनुभव अस्सल होते. मी देखील शाळा सोडून जीवनाच्या शाळेत शिकू लागलो तेंव्हाच माझं लेखन मूळ धरु लागलं, त्यातला पुस्तकीपणा नाहीसा होत गेला व ते लोकांना आवडू लागलं. माझ्यातला मी मला स्वत:ला सापडलो असं मला वाटतं.

# जय हिंद

वंदे मातरम चा नारा,
हिंदोस्ता आम्हांस प्यारा
प्रगती पथास नेण्या,
सज्ज इथला युवा सारा...
मुलुखगिरी करताना
साद कानी भूमातेची,
पदस्पर्श तुजला करीत,
होई सार्थकता जन्माची...
पांग तुझे फेडण्यास
आम्ही वचनबध्द
तुझ्या सेवेसाठी माते,
दिन-रात्र आम्ही सिध्द
तुझिया अंगाखांद्यावर
लहानाचे मोठे झालो
तुझिया पदकमली,
तीर्थाचे अमृत प्यालो
ना द्वेष अमुच्या घरात
ना भय अमुच्या मनात
शिकवण तुझी समभावची
भिनली नसा-नसांत...
जहालो आम्ही धन्य धन्य,
उदरात तुझिया वाढून
हे सार्थक या जन्माचे,
जीवन तुलाच अर्पून...